MHSN040003322019

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | २९.०३.२०१९ |
| नोंदणी दिनांक | २९.०३.२०१९ |
| निर्णय दिनांक | १६.०४.२०२६ |
| कालावधी | ०७व. ०० म. १८ दि. |
| **निशाणी नं.** | **५४** |

**<u>जिल्हा न्यायाधीश २ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश</u>**

**<u>इस्लामपूर यांचे न्यायालयात,</u>**

**पिठासीन अधिकारी –**श्री.अनिरुध्द यशवंत थत्ते

निकाल दिनांक – १६/०४/२०२६

## <u>सत्र खटला क्र. ३७/२०१९</u>

**गु.र.नं. २०/२०१८**

पोलीस स्टेशन – शिराळा

**फिर्यादी** महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक,
शिराळा पोलीस ठाणे.

तर्फे विधीज्ञ श्री.आर. एस. पाटील, अतिरीक्त सरकारी अभियोक्ता

**आरोपी**
१. सुरज सर्जेराव दबडे,
वय २२ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. वाठारपैकी साखरवाडी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर.

२. ओंकार महेश सुर्यवंशी,
वय १९ वर्षे, धंदा - शेती,
रा. बँक ऑफ इंडीयासमोर, कासेगाव,
जि. सांगली.

३. गोविंद वसंत माळी,
वय १९ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. यशवंत कॉलनी, कासेगाव, ता. वाळवा,
जि. सांगली.

४. विराज गणेश कारंडे,
वय १९ वर्षे, धंदा - शेती,
रा. पाडळी दरवेश, ता. हातकणंगले,
जि.कोल्हापूर.

**तर्फे विधीज्ञ** आ.क्र. १,३,४ – श्री. एम. बी. राजवर्धन वकील.
आ.क्र. २ – श्री. एस. एम. नवाळे वकील.

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३.०३.२०१८ |
| प्रथम खबर नोंदविल्याचा दिनांक | ०३.०३.२०१८ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | ३०.०६.२०१८ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०५.०७.२०२४ |
| पुरावा नोंदविणेस सुरुवात केल्याचा दिनांक | ०३.१२.२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवलेचा दिनांक | १६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १६.०४.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपींचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | दोषारोपाचा तपशील | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरज सर्जेराव दबडे | ०३.०४.२०१८ | दि. १४/०३/२०२३ रोजी नि.९ वरील आदेशाप्रमाणे जामीन मंजूर पण जामीन दिला नाही. इतर गुन्हयात अटकेत आहे. | भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | लागू नाही | ८ व.० म.१३ दि. |
| २ | ओंकार महेश सुर्यवंशी | ०३.०४.२०१८ | १८.१२. २०२४ | | | | --- |
| ३ | गोविंद वसंत माळी | ०३.०४.२०१८ | २३.०३. २०२६ | | | | --- |
| ४ | विराज गणेश कारंडे | ०३.०४.२०१८ | २३.०३. २०२६ | | | | --- |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे तपासलेल्या साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष :

| सा.क्र. | नांव | निशाणी | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी रघुनाथ मदने | ४२ | फिर्यादी |
| २ | संदिप कृष्णा चिकूर्डेकर | ४४ | पंच साक्षीदार |
| ३ | स्वप्नील विजयकुमार घोंगडे | ४८ | तपासी अंमलदार |

**ब. बचाव पक्षातर्फे साक्षीदार, असल्यास :**

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय तर्फे दाखल कागदपत्रांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र :**

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ४३ | फिर्याद |
| २ | ४५ | आगार व्यवस्थापक, शिराळा यांनी पोलीस स्टेशनला दिलेले पत्र |
| ३ | ४६ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ४९ | आगार व्यवस्थापक, शिराळा यांना दिलेले पत्र |
| ५ | ५० | जप्ती पंचनामा |
| ६ | ५१ | तहसिलदार, शिराळा यांना दिलेले पत्र |

**ब१. बचाव पक्षातर्फे दाखल कागदपत्राची यादी :**

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**ब२. बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | नाही |

**क. न्यायालयातर्फे निशाणी :**

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**ड. भौतिक वस्तू :**

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | आर्टीकल ए | पॅरागॉन चप्पल जोड. |
| २ | आर्टीकल बी | दगड. |
| ३ | -- | एक सॅमसंग झेड-१ कंपनीचा पांढरे रंगाचा मोबाईल. |
| ४ | -- | एक सॅमसंग जे.प्रो. मॉडेलचा पांढरे रंगाचा मोबाईल. |
| ५ | -- | एक मोनस्टार कंपनीचे काळे रंगाचे जर्कींग. |
| ६ | -- | रोख रक्कम त्यामध्ये ५०० व १०० रू. दराच्या चलनी नोटा. |

दोषारोप : भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ अन्वये अपराध.

## न्यायनिर्णय

१. आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ अन्वये खटला चालविण्यात आला.

**<u>सरकार पक्षाचे कथन</u>** –

२. फिर्यादी शिवाजी रघुनाथ मदने हे रेठरेधरण अजिंक्यचौक, ता. वाळवा येथे राहणेस आहेत. ते सुनंदा दुध डेअरी शिराळा येथे डिसपॅच क्लर्क म्हणून नोकरीस आहेत. दि. ०२/०३/२०१८ रोजी चार ते बाराची रात्रपाळी करून ते रात्री १२.०० वाजता त्यांची मोटारसायकल क्र. एमएच१०/ए.एस./१८०७ वरून घरी जाणेकरीता निघाले. रात्री सुमारे १२.३० वाजता ते रेड गावचे हद्दीतील पॉलिटेक्नीकल कॉलेज ओलांडून अर्धा कि.मी. पुढे आले असता त्यांचे पाठीमागून तीन मोटारसायकली आल्या. त्यावर एकूण सहा इसम होते. त्यांच्यापैकी एका मोटारसायकलस्वाराने आपले वाहन फिर्यादीच्या वाहनाला आडवे आणून थांबवले. नंतर सदर मोटारसायकलवरील सहा इसमापैकी एकजण मोटारसायकलवरून खाली उतरून फिर्यादीच्या गळ्याला तलवार लावून अंगावरील सर्व वस्तू काढून देण्यास सांगितले. तसेच दुस–या इसमाने तेथील दगड उचलून त्यांना डोक्यात मारण्याची भिती दाखविली. त्यावेळी फिर्यादीला त्यांचेसोबत असलेले इतर चार इसमांनी त्यांचे हात पाठीमागे धरून त्यांना ढकलत बाजूस असलेले मोकळे पटांगणात रस्त्यापासून १० ते १५ फुट आतमध्ये घेऊन गेले. त्यावेळी त्यांच्या अंगावर तलवार उगारून

"तु अंगावरील सर्व वस्तू दे नाहीतर तुला मारतोच" असे म्हणते होते तसेच त्यांना ते सर्वजण "तु ओरडलास तर तुला ठेवणार नाही" असे म्हणत होते. त्यांनी त्या सर्वांच्या भितीने त्यांचे हेल्मेट, जर्कींग, मोबाईल फोन, ए.टी.एम. कार्ड, शर्टचे व पँटचे खिशातील रोख रक्कम १,५००/– रूपये तसेच वाहन चालविण्याचा परवाना या वस्तू काढून दिल्या. ते सहा जण परत जात असताना फिर्यादीने त्यांना माझा मोबाईल परत द्या त्यामध्ये माझे नंबर आहेत असे सांगितले असता त्यापैकी एकाने त्याचेजवळचा एक मोबाईल फिर्यादीच्या डब्याच्या पिशवीमध्ये घालून दिला. त्या सहा जणांनी फिर्यादीच्या मोटारसायकलमधील सर्व पेट्रोल काढले व मोटारसायकलची चावी घेऊन चोरटे पेठ गावचे दिशेने त्यांच्या मोटारसायकलवरून निघून गेले. त्यानंतर फिर्यादीने त्यादिवशी संध्याकाळी शिराळा पोलीस ठाण्यामध्ये वर्दी जबाब दिला आणि त्याआधारे पोलीसांनी भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ प्रमाणे गुन्हा क्र. २०/२०१८ नोंदविला.

३. गुन्हयाचा तपास शिराळा पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरिक्षक श्री. स्वप्नील घोंगडे यांनी केला. तपासामध्ये गुन्हा सहा व्यक्तींनी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामध्ये वरील चार आरोपी आणि दोन विधीसंघर्षित बालक होते. तपास पूर्ण झाल्यावर वरील आरोपांसाठी चारही आरोपींविरुध्द प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी शिराळा यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०९ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३९५ व ३९७ हे अपराध सत्र न्यायालयात चालण्यायोग्य असल्याने न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग शिराळा यांनी सदरचा खटला या न्यायालयाकडे वर्ग केला.

५. आरोपींविरुध्द निशाणी २४ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ या कलमाखाली दोषारोप निश्चित करण्यात आला. आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारला व खटला चालवण्याची विनंती केली. सुनावणी दरम्यान आरोपी न्यायालयीन बंदी आहेत.

६. न्यायालयात खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे उपरोक्त तालिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे एकून तीन साक्षीदार तपासण्यात आले व दस्तऐवज शाबीत करण्यात आले.

७. अभियोग पक्षाने निशाणी नि. ५२ अन्वये पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली.

८. सरकार पक्षाचा पुरावा झालेनंतर आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आला. सदरची खोटी केस केली आहे असा आरोपींनी बचाव घेतला.

९. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. पाटील व आरोपी क्र. १, ३ व ४ तर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. राजवर्धन तसचे

आरोपी क्र. २ करीता विधीज्ञ श्री. एस. एम. नवाळे यांचा युक्तीवाद ऐकला.

१०. सरकार पक्षाची केस व एकंदरीत परिस्थिती विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दि.०३/०३/२०१८ रोजी ००.३० वाजताचे सुमारास पॉलिटेक्नीक कॉलेज, शिराळा ते पेठ नाका रोड पासून अर्धा कि.मी. अंतरावर आरोपी क्र. १ ते ४ यांनी दोन विधीसंघर्षित बालक यांच्यासोबत मिळून एकमेकांच्या संगनमताने तक्रारदार शिवाजी रघुनाथ मदने यांचा मोबाईल हॅण्डसेट, रक्कम रूपये १,५००/–, हेलमेट, पॅरागॉन चप्पल, जरकिन, ए.टी.एम. कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, तक्रारदार यांची डायरी आणि मोटारसायकलमधील पेट्रोल या लुटून दरोडा टाकला आणि भारतीय दंड संहिताचे कलम ३९५ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करते काय ? | नकारार्थी. |
| २ | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी दोन विधीसंघर्षित बालक यांच्यासोबत मिळून एकमेकांच्या संगनमताने वर नमुद पध्दतीने दरोडा टाकताना तलवार आणि दगड | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | यासारख्या हत्यारांचा वापर केला आणि भारतीय दंड संहिताचे कलम ३९७ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करते काय? | |
| ३ | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी दोन विधीसंघर्षित बालक यांच्यासोबत मिळून एकमेकांच्या संगनमताने तक्रारदार शिवाजी रघुनाथ मदने यांना गैरपणे निरूध्द केले आणि भारतीय दंड संहिताचे कलम ३४१ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करते काय ? | नकारार्थी. |
| ४ | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी दोन विधीसंघर्षित बालक यांच्यासोबत मिळून एकमेकांच्या संगनमताने तक्रारदार शिवाजी रघुनाथ मदने यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करते काय ? | नकारार्थी. |
| ५ | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी दोन विधीसंघर्षित बालक यांच्यासोबत मिळून एकमेकांच्या संगनमताने तक्रारदार शिवाजी रघुनाथ मदने यांना धमकावताना त्यांच्याजवळ तलवारीसारखे हत्यार बाळगले व | नकारार्थी. |

भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह २५ प्रमाणे
गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करते काय

६ आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीस निर्दोष सोडण्यात आले

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ५ बाबत –**

११. अभियोग पक्षातर्फे सर्वप्रथम हे शाबीत करणे आवश्यक आहे की १. दि. ०३/०३/२०१८ रोजी ००.३० वाजता शिराळा ते पेठ नाका रस्त्यावर दरोडा टाकायचा या सामाईक हेतूने सर्व आरोपी आले. २. त्या आरोपींनी त्यावेळेस रस्त्याने जाणारे फिर्यादी शिवाजी रघुनाथ मदने यांना अडवले आणि त्यांच्याकडून मोबाईल हॅण्डसेट, रक्कम रूपये १,५००/–, हेलमेट, पॅरागॉन चप्पल, जरकिन, ए.टी.एम. कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, तक्रारदार यांची डायरी आणि मोटारसायकलमधील पेट्रोल इत्यादी वस्तू लुटून दरोडा टाकला. ३. सदरचा दरोडा टाकताना सर्व आरोपींकडे किंवा त्यांच्यापैकी कोणाकडे तलवारीसारखी किंवा दगडासारखे शस्त्र होते आणि त्यांनी फिर्यादीला मारण्याची धमकी दिली.

१२. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या तीन साक्षीदारांपैकी साक्षीदार क्र. १ शिवाजी मदने हा फिर्यादी असून साक्षीदार क्र. २ संदिप चिकुर्डेकर हे घटनास्थळ पंचनाम्याचे पंच आहेत. साक्षीदार क्र. ३ सहा. पोलीस

निरीक्षक घोंगडे हे अन्वेषण अधिकारी आहेत.

१३. येथे मी नमुद करू इच्छितो की, अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे या गुन्हयातील आरोपींना कोडवणे पोलीस ठाणे, कोल्हापूर येथील गुन्हा क्र. ३३/२०१८ मध्ये अटक करण्यात आली होती. त्या गुन्हयाच्या तपासाच्या वेळी आरोपींनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्या गुन्हयाच्या तपासाच्या कामी अन्वेषण अधिका–याने या गुन्हयातील मुद्देमाल पंचनामा करून जप्त केले होते आणि तपासामध्ये त्या गुन्हयातील अन्वेषण अधिका–याकडून पंचनाम्याची प्रत आणि जप्त मुद्देमाल श्री. घोंगडे यांना प्राप्त झाला. सदर मुद्द्यावर श्री. घोंगडे यांचा तोंडी पुरावा अभियोग पक्षाच्या कथनांशी सुसंगत आहे. आपल्या उलटतपासात श्री. घोंगडे कबूल करतात की, कोडोली पोलीसांकडून जप्त मुद्देमाल प्राप्त झाल्यानंतर फिर्यादीकडून तो पडताळून त्याचा पडताळणी पंचनामा करण्यात आला नव्हता. येथे नमुद करावे लागेल की, दाखल मुद्देमालाबाबतचा मुळ जप्ती पंचनामा न्यायालयासमक्ष नाही. दाखल पंचनाम्याची प्रत पुराव्याच्या कायद्याप्रमाणे शाबित झालेली नाही. न्यायालयामध्ये दाखल मुद्देमाल जो कोडोली पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाला होता असे अभियोग पक्षाचे म्हणणे आहे त्या वस्तू आणि रक्कम फिर्यादीने साक्ष देताना ओळखलेल्या नाहीत. परिणामी, न्यायालयात दाखल केलेला सॅमसंग कंपनीचा फोन, जरकीन आणि रोख रक्कम रू.१५००/– आरोपींकडून जप्त झाले हे निर्वीवादपणे सिध्द होत नाही. तसेच त्या वस्तू फिर्यादीच्या आहेत असेदेखील निर्वीवादपणे सिध्द झालेले नाही.

१४. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला महत्वाचा साक्षीदार म्हणजे साक्षीदार क्र. १ शिवाजी मदने. त्याने आपल्या सरतपासात दि.०२/०३/२०१८ रोजी कामावरून परतत असताना पेठ–शिराळा रस्त्यावर शिवाजीराव देशमुख पॉलिटेक्नीक कॉलेजच्या पुढे रात्री १२.०० नंतर तो पोहोचला तेव्हा तीन मोटारसायकलवर सहा जणांनी त्याला अडविले असे सांगितले आहे. सहा जणांपैकी एकाने तलवार फिर्यादीच्या गळ्याला लावली आणि ठार मारतो अशी धमकी दिली. एकाने फिर्यादीच्या मोटारसायकलला धक्का मारला, एकाने तुझ्याजवळ काय काय आहे ते काढून दे असे सांगितले. त्या सहा जणांनी त्याला गाडीवरून उतरवून रस्त्याच्या बाजूला सुमारे १० फुट अंतरावर नेले आणि एकाने दगड डोक्यात घालण्याची धमकी देऊन चीजवस्तू मागितल्या असेही तो सांगतो. फिर्यादी पुढे सांगतो की त्याने आपल्याजवळील सॅमसंग कंपनीचा मोबाईल, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, हेलमेट, जरकीन आणि रोख रक्कम रूपये १५००/– दिले. त्या सहा जणांपैकी एकाने फिर्यादीची चप्पल काढून घेतली आणि स्वतःची स्लीपर दिली. दुचाकीची किल्ली काढून घेतली. फिर्यादीने मोबाईल फोन परत मागितला असता एकाने आपल्या जवळचा जुना मोबाईल फोन त्याच्या पिशवीत टाकला. तो घरी चालत परतला आणि नंतर पोलीसांना फिर्याद दिली.

१५. फिर्यादी पुढे सांगतो की, पोलीसांना त्याने घटनास्थळ दाखविले आणि घटनास्थळावर पोलीसांनी दाखविलेला दगड जप्त केला तसेच दरोडेखोरांनी दिलेली स्लीपर जोड आणि मोबाईल फोन पण त्याने पोलीसांना दिला आणि पंचनामा करून पोलीसांनी या सर्व वस्तू जप्त केल्या.

१६. सकृतदर्शनी घटनेबाबतचा फिर्यादीचा पुरावा अभियोग पक्षाच्या कथनांशी सुसंगत आहे. वर्दी जबाबातील कथने आणि फिर्यादीचा तोंडी पुरावा सुसंगत आहेत. परंतु, येथे नमूद करावे लागेल फिर्यादी पुढे सांगतो की न्यायालयामध्ये दाखल केलेला चप्पलजोड आरोपीने दिलेला चप्पलजोड नाही कारण आरोपीने दिलेला चप्पलजोड हा जुना वापरता चप्पलजोड होता, स्लीपर नव्हती. म्हणजेच न्यायालयात दाखल केलेला आर्टीकल ए ला असलेला पॅरागॉन कंपनीचा चप्पलजोड हा तो जोड नाही जो घटनास्थळ पंचनामा करताना फिर्यादीने पोलीसांना दिला होता. फिर्यादीने दिलेला चप्पलजोड कोठे आहे याचा कोणताही खुलासा अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला नाही. ही त्रुटी महत्वाची त्रुटी म्हणावी लागेल.

१७. या प्रकरणातील चारही आरोपींना फिर्यादीचा पुरावा नोंदविला तेव्हा तुरुंगातून व्ही.सी.च्या माध्यमातून हजर केलेले होते. त्यामुळे हजर केलेले आरोपी हे गुन्हयातील आरोपी आहेत हे फिर्यादीने सांगणे पुरेसे ठरत नाही. चारही आरोपींपैकी कोणी कोणते कृत्य केले हे तो सांगू शकलेला नाही. गळ्याला तलवार लावणारा कोण, दगड उगारणारा कोण, पिशवीमध्ये मोबाइल टाकणारा कोण आणि चप्पल टाकणारा कोण हे तो सांगू शकलेला नाही. येथे नमूद करावे लागेल की, अन्वेषण अधिकारी श्री. घोंगडे यांनी ओळख चाचणी करण्यासाठी जरी तहसिलदारांना निशाणी ५१ प्रमाणे पत्र दिले असे सांगितले असले तरी तशी ओळखचाचणी झाली असे ते सांगत नाहीत. तसेच, तशी कुठली ओळखचाचणी झाली असल्यास त्याचा पंचनामा अथवा इतर कागदोपत्री पुरावा न्यायालयामध्ये दाखल केलेला नाही. परिणामी गुन्हा घडल्यानंतर सुमारे ८ वर्षानंतर फिर्यादीने व्ही.सी.वर हजर केलेले आरोपी

ओळखणे आरोपींचा गुन्हयातील सहभाग सिध्द करण्यासाठी पुरेसे नाही. आरोपींचा गुन्हयातील सहभाग साक्षीदार क्र. १ च्या साक्षीतून निर्वीवादपणे सिध्द होत नाही.

१८. साक्षीदार क्र. २ हा घटनास्थळाचा पंच असून त्याने घटनास्थळ पंचनामा निशाणी ४६ शाबित केला आहे. घटनास्थळाबाबत आणि घटनास्थळ पंचनामा करण्याबाबत त्याच्या शपथेवरील पुराव्यावरती अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. परिणामी, फिर्यादीच्या घटनास्थळाबाबतच्या शपथेवरील पुराव्याला साक्षीदार क्र. २ संदिप चिकुर्डेकर यांच्या पुराव्याची आणि पंचनामा निशाणी ४६ ची पुष्टी मिळते.

१९. दि.०३/०३/२०१८ रोजी रात्री ००.३० वाजता फिर्यादी शिवाजी मदने हे आपल्या कामावरून मोटारसायकलवरून परतत असताना पेठ शिराळा रस्त्यावर सहा इसमांनी त्यांना अडवून तलवारीसारख्या शस्त्राचा आणि दगडाचा धाक दाखवून त्यांच्याकडून मोबाईल हॅण्डसेट, रक्कम रूपये १,५००/–, हेलमेट, पॅरागॉन चप्पल, जरकिन, ए.टी.एम. कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, तक्रारदार यांची डायरी आणि मोटारसायकलमधील पेट्रोल या वस्तू लुटून दरोडा टाकला हे जरी सिध्द झाले असले तरी न्यायालयासमोरील आरोपी हे सदरील सहा व्यक्तीपैकी होते हे निर्वीवादपणे सिध्द होत नाही. परिणामी, दि.०३/०३/२०१८ रोजी रात्री ००.३० वाजता फिर्यादी शिवाजी मदने हे आपल्या कामावरून मोटारसायकलवरून परतत असताना पेठ शिराळा रस्त्यावर न्यायालयासमोरील चार आरोपींनी इतर दोन विधीसंघर्षित बालकांच्या सोबत सामाईक हेतूने दरोडा टाकला, त्यावेळेस त्यांच्यापैकी कोणी तलवार अथवा दगडासारख्या शस्त्राचा दाख

दाखविला आणि फिर्यादीला लुटले हे निर्वीवादपणे सिध्द होत नाही. आरोपी घटनास्थळी हजर होते हे सिध्द होत नाही. परिणामी त्यांच्यावरील कोणताही दोषारोप निर्वीवादपणे सिध्द होत नाही. अशा परिस्थितीत मी सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी देतो आणि खालीलप्रमाणे आदेश देतो.

## आदेश

१ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अनुसार आरोपी क्र. १ सुरज सर्जेराव दबडे, क्र. २ ओंकार महेश सुर्यवंशी, क्र. ३ गोविंद वसंत माळी, ४. विराज गणेश कारंडे याची दंड संहिता कलम ३९५, ३९७, ३४१, ५०६ सह कलम ३४ तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ अन्वयेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ आरोपी क्र. १ सुरज सर्जेराव दबडे हा न्यायालयीन बंदी असून या गुन्हयातून त्याला तात्काळ सोडण्यात यावे. इतर आरोपी या प्रकरणात जामिनावर सुटलेले आहेत परंतु इतर प्रकरणात तुरुंगात आहेत. तुरुंग प्रशासनाला या निकालाची प्रत पाठविण्यात यावी.

३ मुद्देमाल मिळकत –

१. जप्त मुद्देमाल दगड, पॅरागॉन कंपनीचा चप्पलजोड हे आता किंमतशुन्य असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर त्यांचा नाश करण्यात यावा.

२. जप्त मुद्देमाल मॉनस्टर कंपनीचे जरकीन व रोख रक्कम रू. १,५००/– तसेच सॅमसंग कंपनीचा पांढरा जे.प्रो. मोबाईल फोन आयएमईआय नं. ३५७७०७०८८९३८४९२/०१ व ३५७७०७०८८९३८४९०/०१ हा आरोपींनी मागितलेला नाही. अभियोग पक्षाच्या म्हणण्यानुसार त्या वस्तू फिर्यादीच्या आहेत.

परिणामी अपिलाचा कालावधी संपल्यानंतर तो मोबाईल फोन, जरकीन आणि रक्कम फिर्यादी शिवाजी रघुनाथ मदने यांना देण्यात यावी.

३. जप्त् मुद्देमाल सॅमसंग झेड–१ पांढरा मोबाईल फोन आयएमईआय नं. ३६७३९४/ ०६/ २८४९८६/० व ३६७३९५/ ०६/ २८४९८६/७ हा दरोडेखोरांनी फिर्यादीला दिलेला फोन आहे. परंतु, कोणत्याही आरोपीने तो मागितलेला नाही. करीता तो मोबाईल फोन जप्त करण्यात येतो. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर लिलाव करून तो मोबाईल फोन विकण्यात यावा आणि आलेली रक्कम सरकारभरणा करण्यात यावी.

४. विधिसंघर्षित बालकांविरूध्द दाखल प्रकरण निकाली निघाल्यानंतर तसेच या प्रकरणाच्या अपीलाचा कालावधी संपल्यानंतर वर निर्देशित केल्याप्रमाणे मुद्देमालाची विल्हेवाट लावावी.

४ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ अनुसार आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा देऊन पुर्तता करणेची आहे.

५ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ अनुसार न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी सांगली यांना पाठविण्यात यावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

ANIRUDDHA YASHWANT THATTE

Digitally signed by ANIRUDDHA YASHWANT THATTE
Date: 2026.04.16 16:36:54 +0530

(अनिरुध्द यशवंत थत्ते.)

दि– १६/०४/२०२६

जिल्हा न्यायाधीश २ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश इस्लामपूर .